**महाराष्ट्र शासन**

# विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय (विकास शाखा)

दालन क्र. ११२, पहिला मजला, कोकण भवन, नवी मुंबई ४००६१४.

दूरध्वनी व फॅक्स क्र. ०२२-२७५७१३६९ ई मेल : estkonkan@gmail.com

क्र.विकास/मविसे/कार्या-१/वि.अधि.शिक्षण /प्र.क्र.६३७८३७/२०२४ दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२५.

**प्रति,**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग**

**विषय : महाराष्ट्र विकास सेवा गट-ब मध्ये पदोन्नती देणेसाठी विस्तार अधिकारी (शिक्षण) यांची दि. १.१.२०२२, १.१.२०२३ व १.१.२०२४ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतायादी प्रसिध्द करणेबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये महाराष्ट्र विकास सेवा गट-ब मध्ये पदोन्नतीने नेमणूका देणेसाठी जिल्हा परिषद सेवेतील विस्तार अधिकारी (शिक्षण)या संवर्गाची दिनांक १.१.२०२२ व दि.१.१.२०२३ व दिनांक १.१.२०२४ अखेरची तात्पुरती ज्येष्ठतासूची ग्राम विकास विभागाच्या दि.३१.३.२०१७ च्या परिपत्रकानुसार तयार करण्यात आलेली असून सदर सेवाजेष्ठतासूची या सोबत जोडून आपणाकडे पाठविण्यात येत आहे.

शासनाच्या १०० दिवसांच्या कृती आराखडयातील ७ कलमी कार्यक्रमा अंतर्गत पदोन्नतीची कार्यवाही करावयाची आहे. यास्तव सोबत जोडलेल्या सेवाजेष्ठतासूची संबंधित कर्मचाऱ्यांच्या तात्काळ निदर्शनास आणून दयावी. सेवाजेष्ठतासूचीस कर्मचाऱ्यांची हरकत असल्यास कर्मचाऱ्यांना हरकती घेण्यास दोन दिवसाची मुदत निश्चित करण्यात आलेली आहे.

यास्तव तात्पुरती सेवाजेष्ठतासूची आपणांस प्राप्त झालेल्या दिनांकापासून दोन दिवसात सेवाजेष्ठतासूचीतील प्रत्येक कर्मचाऱ्यास मुख्यालयात बोलावून त्यांना सेवाजेष्ठतासूची निदर्शनास आणून देऊन त्यांची दिनांकीत पोहोच सेवाजेष्ठतासूचीतील स्वाक्षरी असलेल्या रकान्यात घेऊन त्या सेवाजेष्ठतासूची प्रत या कार्यालयास सादर करावी. तात्पुरती सेवाजेष्ठतासूची निदर्शनास आणून दिलेली नाही असा एकही कर्मचारी शिल्लक राहणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित खाते प्रमुख यांची राहील.

तात्पुरत्या सेवाजेष्ठतासूचीला कर्मचाऱ्यांनी हरकत घेतली असल्यास सर्व हरकती एकत्रित करुन दोन दिवसात या कार्यालयास सादर कराव्यात. या कार्यालयास दोन दिवसानंतर प्राप्त झालेल्या हरकतीचा विचार न करता अंतिम सेवाजेष्ठता सूची प्रसिध्द करण्यात येईल.

Signed by
Minal Pramod Kute
Date: 27-02-2025 17:51:43

सोबत –दि.१.१.२०२२ व दि.१.१.२०२३ व दिनांक १.१.२०२४ ची तात्पुरती जेष्ठतासूची व हरकतींबाबतचा नमुना.

**उप आयुक्त (आस्थापना)**
**कोकण विभाग**

## जेष्ठतासूची प्रसिद्ध केल्याबाबत सादर करण्याच्या माहितीचा नमुना

विभागीय आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त झालेली **विस्तार अधिकारी (शिक्षण)** या संवर्गाची दिनांक १.१.२०२२, दि.१.१.२०२३ व दि.१.१.२०२४ ची तात्पुरती जेष्ठतासूची सर्व संबंधितांचे निदर्शनास आणून त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेऊन दप्तरी ठेवण्यांत आली आहे.

सदर जेष्ठतासूची बाबत खालील प्रमाणे हरकती प्राप्त झाल्या आहेत. तरी त्यानुसार दिनांक १.१.२०२२, दि.१.१.२०२३ व दि.१.१.२०२४ चे जेष्ठतासूचीमध्ये नोंद घेण्यात यावी.

| अ.क्र. | आक्षेप/हरकत प्राप्त झालेल्या कर्मचाऱ्याचे नाव | घेण्यात आलेली आक्षेप/ हरकत | प्राप्त आक्षेप/ हरकती बाबतचा अभिप्राय | आक्षेप / हरकती बाबत जोडण्यात आलेले पुरावे/ कागदपत्र |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

खातेप्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का